■ २२ कॅरेट सोने दर : १,३५,७००/- ■ चांदी दर : २,३०,०००/-

शब्दांना सत्याची धार

प्रहार

सिंधुदुर्ग • शनिवार ११ जुलै, २०२६ | RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ • वर्ष २२ • अंक २४२ • पाने ८ • ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in

एम्बाप्पे, डेंबेलेच्या गोलने फ्रान्स उपांत्य फेरीत!

पान ८

विनाअट सरसकट शेतकरी कर्जमाफी जाहीर

शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी मिळणार

५० हजारांची अट रद्द , ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार लाभ - मुख्यमंत्री

मुंबई (प्रतिनिधी)

राज्यातील बळीराजासाठी राज्य सरकारने पावसाळी अधिवेशनात आतापर्यंतची सर्वात मोठी आणि ऐतिहासिक घोषणा केली आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजने'अंतर्गत शेतकऱ्यांना दिली जाणारी ५० हजार रुपये भरण्याची जाचक अट सरकारने पूर्णपणे काढून टाकली आहे. यामुळे राज्यातील तब्बल ५६ लाख शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची सरसकट कर्जमाफी मिळणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावरील विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील शेतकरी हिताला प्राधान्य देत असल्याचे अधोरेखित केले.

या निर्णयामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

विरोधकांकडून या कर्जमाफी योजनेवर होत असलेल्या टीकेला फडणवीस यांनी आकडेवारीसह सडेतोड उत्तर दिले. "या योजनेमुळे केवळ ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय होईल आणि १२-१३ हजार कोटींचाच लाभ मिळेल, हा दावा पूर्णपणे चुकीचा आहे. राष्ट्रीयकृत, व्यापारी आणि जिल्हा मध्यवर्ती बँकांकडून गोळा केलेल्या अचूक डेटानुसार, ही योजना ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळवून देणारी ऐतिहासिक योजना आहे," असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

५० हजारांची अट का काढली?

कर्जमाफीबाबत अभ्यास करण्यासाठी सरकारने 'प्रवीण परदेशी समिती' स्थापन केली होती. वारंवार कर्जमाफी दिल्यास शेतकरी कर्ज भरणे थांबवतील आणि बँकिंग व्यवस्था कोलमडेल, अशी भीती या समितीने व्यक्त केली होती. त्यामुळे मागील योजनेत लाभ घेतलेल्यांना पुन्हा कर्जमाफी देताना काही रक्कम (उदा. ५० हजार) भरण्याची अट सुचवली होती. मात्र, महायुतीच्या सर्व आमदारांनी ही ५० हजारांची अट रद्द करण्याची जोरदार मागणी लावून धरली. ही अट काढल्यास तिजोरीवर ३ ते ४ हजार कोटींचा अतिरिक्त भुर्दंड पडेल (पान २ वर)

'भाडे के टट्टू'वर आक्षेप घेणारे 'सुपारीबाज'

पायाभूत सुविधांच्या कामांवरून खोट्या बातम्या पसरवून 'मिसिंग लिंक'च्या पुलाबाबत चिखलफेक करणाऱ्या विरोधकांना 'सुपारीबाज' आणि 'भाटक गदर्भ' (भाडोत्री गाढव) म्हणत प्रतिटोला लगावला. 'मिसिंग लिंक' प्रकल्पाच्या पुलाला एकही तडा (क्रॅक) गेला नसताना ७ हजार कोटी पाण्यात गेल्याच्या खोट्या बातम्या पेरून महाराष्ट्राचा अपमान केला जात असल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

(पान २ वर)

अजित पवारांच्या अपघाताचे सत्य बाहेर आणणारच

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, सीआयडी आणि 'एएआयबी' यंत्रणांकडून दोन प्रकारे तपास सुरू आहे. 'एएआयबी'चा अंतिम अहवाल साधारणतः जानेवारी २०२७ पूर्वी येईल. केंद्र सरकारच्या विनंतीनुसार यात परदेशी तज्ज्ञांची मदत घेतली जात असून, ब्लॉक बॉक्समधील संपूर्ण डेटा डाऊनलोड झाला आहे. पायलट सुमीत कपूर यांच्या बँक खात्यांची, शेअर्सची तपासणी केली असता काहीही संशयास्पद आढळलेले नाही. दादांच्या पुण्यतिथीपूर्वी हा अहवाल येईल आणि त्यातील सत्य बाहेर आल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात लवकरच 'रिव्हर्स मायग्रेशन' सुरू होणार

पालकमंत्री नितेश राणे यांचा विश्वास; जहाज बांधणीसह मत्स्य-बंदर क्षेत्रात असंख्य प्रकल्प येणार

पुढील पाच वर्षे रोजगार निर्मितीसाठी!

"हा तर पहिला टप्पा आहे, अजून असंख्य पर्यावरणपूरक प्रकल्प जहाज बांधणी क्षेत्रात, बंदर क्षेत्रात, मत्स्य व्यवसाय आणि पर्यटन क्षेत्रात आपल्या सिंधुदुर्गामध्ये लवकरच येत आहेत. त्यामुळे पुढील पाच वर्षे आम्ही रोजगार निर्मितीच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेणार आहोत. याचे सकारात्मक परिणाम आमच्या सिंधुदुर्गच्या अर्थकारणावर आणि पर्यायाने कोकणावर होणार आहेत, असा विश्वास मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला.

मुंबई

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ज्या तरुण-तरुणींना नोकरी-धंद्यासाठी मुंबई-पुण्यासह अन्य जिल्ह्यात, राज्यात किंवा परदेशात जावे लागले आहे, त्यांना पुन्हा आपल्या हक्काच्या मातीत परत आणण्यासाठी म्हणजेच जिल्ह्यात 'रिव्हर्स मायग्रेशन' सुरू करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सिंधुदुर्गचा पालकमंत्री म्हणून मी जनतेला दिलेला हा शब्द असून, त्याच मार्गावर चालण्याच्या दृष्टीने टाकलेले हे पहिले मजबूत पाऊल आहे, असा विश्वास राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केला. मंत्रालयात महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड आणि 'झोया मरीन' कंपनी यांच्यात पार पडलेल्या १५० कोटी रुपयांच्या सामंजस्य करारानंतर ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या 'मुंबई वॉटर मेट्रो'साठी लागणाऱ्या अत्याधुनिक बोटींची निर्मिती आता सिंधुदुर्गात होणार आहे. या प्रकल्पांतर्गत ५० आणि १०० प्रवासी क्षमता असलेल्या जवळपास १०० बोटी बनवण्याचा पहिला टप्पा कंपनीला दिला गेला असून, हा भव्य कारखाना सावंतवाडी तालुक्यातील तळवणे गावात उभा राहणार असल्याची माहिती नितेश राणे यांनी दिली. बोट क्राफ्ट, येल्लो फ्लीट यांसारख्या नामवंत कंपन्यांनी एकत्र येऊन हा प्रकल्प सिंधुदुर्ग जिल्ह्यात उभारण्याचे निश्चित केले आहे. या कारखान्यामुळे जिल्ह्यामध्ये विविध प्रकारच्या नोकऱ्या आणि व्यवसायाच्या (पान २ वर)

खा. नारायण राणे उद्या सिंधुदुर्ग दौऱ्यावर

कणकवली (प्रतिनिधी)

रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघाचे खासदार आणि माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे रविवार, दिनांक १२ जुलै २०२६ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या नियोजित दौऱ्यानुसार मुंबईहून विमानाने गोव्यात उतरल्यानंतर ते रस्ते मार्गाने कणकवली येथील (पान २ वर)

पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजले

पुढील हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून नागपुरात

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत 'महाराष्ट्र विधिमंडळ पावसाळी अधिवेशन समाप्तीनंतर 'चहापान' कार्यक्रमात सर्व मंत्रीमंडळ सहभागी झाले होते. यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि विधिमंडळातील इतर सदस्य उपस्थित होते.

मुंबई

महाराष्ट्र विधानसभेचे पावसाळी अधिवेशन राष्ट्रगीताने संस्थगित करण्यात आले. महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन सोमवार, ७ डिसेंबर २०२६ रोजी नागपूर येथील विधानभवनात होणार असल्याची अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी घोषणा केली. महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात एकूण १४ बैठका घेण्यात आल्या असून १२७ तास ५४ मिनिटांचे प्रत्यक्ष कामकाज झाले. रोजच्या कामकाजाची सरासरी ९ तास ९ मिनिटे इतकी राहिली, अशी माहिती विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी दिली.

सिंधुदुर्गातील वीजपुरवठा पूर्ववत करण्यास वेग; एका दिवसात ५११ वीज खांब उभे

- ५०० अतिरिक्त खांब सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी उपलब्ध
- २४५ कर्मचारी अहोरात्र कार्यरत; १६ गावे व १२ वाड्यांतील वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे काम अंतिम टप्प्यात

मुख्यमंत्री कार्यालयाचे निर्देश आणि पालकमंत्री नितेश राणे यांनी घेतलेल्या कामाच्या आढाव्यामुळे यंत्रणा गतिमान; २८ ट्रांसफार्मर सुरू

कणकवली (प्रतिनिधी)

मुख्यमंत्री कार्यालयाने पालकमंत्री नितेश राणे यांच्या समवेत एमएसइबी विभागाची उच्चस्तरीय बैठक घेऊन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ज्या ज्या गावांमध्ये वीज पुरवठा खंडित झालेला आहे. तो वीजपुरवठा सुरळीत करण्याची सूचना दिली होती. सरकारच याप्रकरणी ॲक्शन मोडवर आल्यावर प्रशासन अधिक गतिमान झाले. एका दिवसात ५११ विजेचे पोल उभे केले व २८ ट्रांसफार्मर दुरुस्त करून त्या ठिकाणाहून वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. ५०० खांब मेजर स्टोरमधून सिंधुदुर्गसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामुळे येत्या दोन दिवसात वीजपुरवठा सुरळीत पूर्ववत होईल असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. २४५ कर्मचारी हा वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी दिवस रात्र काम करत आहेत. पावसाने उसंत घेतली असल्यामुळे कामाला आणखीनच गती आलेली आहे.

सोमवार दि. ६ जुलै २०२६ पासून सिंधुदुर्ग जिल्ह्यात वादळी वारे, पाउस सुरू झाल्यामुळे महावितरणच्या वीज वितरण प्रणालींचे जसे की विद्युत् खांब, रोहित्र, विद्युत् वाहिनी यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. यामध्ये उच्चदाब वाहिनीचे २८२ खांब आणि लघुदाब वाहिनीचे ४१७ खांब पडले असून एकूण २८ रोहित्र बंद पडले आहेत. (पान २ वर)

महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची आमदार निलेश राणे यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आरोग्य सेवांशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील नागरिकांना अधिक दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत सकारात्मक तोडगा निघाला.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची आमदार निलेश राणे यांनी भेट घेतली. यावेळी सिंधुदुर्ग जिल्ह्यासह कुडाळ-मालवण मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्न आणि जनहिताच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.

पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी घेतली मंत्री नितेश राणे यांची सदिच्छा भेट

विधानभवनातील दालनात घेतली भेट; विविध विषयांवर चर्चा

मुंबई :

राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी शुक्रवारी विधानभवनातील मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांच्या दालनात सदिच्छा भेट घेतली. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली. राज्यातील कायदा व सुव्यवस्था तसेच विविध प्रशासकीय बाबींवर दोघांमध्ये संवाद झाला.

अंगणवाडीत 'मॅगी'मसालेवर आक्षेप!

- रेन वॉटर हार्वेस्टिंगलाही महिला समितीचा दणका!
- दीपलक्ष्मी पडते समिती सभेत आक्रमक!

सिंधुनगरी (प्रतिनिधी)

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अंगणवाड्यांमध्ये मुलांना पुरविण्यात येणाऱ्या पोषण आहारात मॅगी व त्यातील मसाल्यांचा समावेश होत असल्याचा गंभीर मुद्दा महिला व बालविकास समितीच्या बैठकीत गाजला. समिती सदस्या सौ. दीपलक्ष्मी पडते यांनी "मुलांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या वस्तू तातडीने बंद करून मालवणी पद्धतीचे पौष्टिक मसाले पुरवावेत," अशी आक्रमक मागणी केली.

याचवेळी लाखो रुपयांचा खर्च करून बसविण्यात आलेली अंगणवाड्यांतील रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा निरुपयोगी ठरल्याचा आरोप करत ही योजना सिंधुदुर्गसाठी उपयुक्त नसल्याचा ठराव त्यांनी मांडला! सभापती अनुराधा नारकर यांनी ही वस्तुस्थिती मान्य करत याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचे आदेश दिले!

जिल्हा परिषद महिला व बाल विकास समितीची सभा सभापती अनुराधा नारकर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी येथील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात संपन्न झाली. यावेळी समिती सचिव तथा महिला बाल विकास अधिकारी प्रतीक हजारे, समिती सदस्य दीपलक्ष्मी पडते, (पान २ वर)

जिंद-सोनीपत मार्गावर धावणार देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन

रेल्वे मंत्रालयाची मंजुरी; हरित क्रांतीचा नवा अध्याय

नवी दिल्ली

भारतीय रेल्वेच्या इतिहासात एक ऐतिहासिक पाऊल उचलले गेले असून, रेल्वे मंत्रालयाने जिंद आणि सोनीपत दरम्यान भारताची पहिली दैनंदिन हायड्रोजन-शक्तीवर चालणारी रेल्वे सेवा सुरू करण्यास औपचारिक मंजुरी दिली आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि स्वच्छ इंधन पर्यायांना चालना देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. ही हायड्रोजन ट्रेन '७४०१०/७४००९' या क्रमांकाने धावणार आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी या ट्रेनला जिंद सिटी, पांदू पिंदारा, ललित खेडा, भांबेवा, ईशापूर खेडी, बुटाणा, खांदराय, गोहाना, राभडा, लाठ, मोहाना, हरियाणा आणि बरवासनी अशा महत्त्वाच्या स्थानकांवर व्यावसायिक थांबे देण्यात आले आहेत.

रेल्वे मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ही ट्रेन "लवकरच प्रवासासाठी सज्ज" आहे. या ट्रेनमध्ये १२०० किलोवॅट हायड्रोजन फ्युएल सेल प्रोपल्शन सिस्टमचा वापर करण्यात आला आहे. ही हायड्रोजन ट्रेन ताशी ७५ किमी वेगाने धावण्यास सक्षम आहे. हायड्रोजन फ्युएल सेल तंत्रज्ञान हायड्रोजनच्या रासायनिक प्रक्रियेतून वीज निर्मिती करते. यामध्ये वाफ हा एकमेव उप-उत्पादक असल्याने पर्यावरणाचे प्रदूषण होत नाही, जे जीवाश्म इंधन-आधारित ट्रेनच्या तुलनेत अत्यंत स्वच्छ आहे.

पायाभूत सुविधा

हरियाणामधील जिंद-सोनीपत विभागाची या प्रकल्पासाठी 'पायलट मार्ग' म्हणून निवड करण्यात आली आहे. जिंद येथे या ट्रेनसाठी स्वदेशी हायड्रोजन साठवणूक आणि इंधन भरण्याची विशेष सुविधा उभारण्यात आली आहे. पेट्रोलियम आणि स्फोटक सुरक्षा संघटनेने या ठिकाणी हायड्रोजन गॅसच्या सुरक्षित साठवणुकीसाठी आणि वितरणासाठी आवश्यक परवाना दिला आहे. इंधन भरण्यासाठी हायड्रोजन कॉम्प्रेशन सिस्टम बसवण्यात आली (पान २ वर)